# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जामनेर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0027 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/01/2022 21:08 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 13/01/2022

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/01/2022

**Time From (वेळेपासून):** 11:56 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:56 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/01/2022 **Time (वेळ):** 19:12 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/01/2022 19:12 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायतसमिती जामनेर कार्यालय जा, जामनेर शहरात,ता भुसावळ

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** ममराज भुरा पवार

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** भुरा पवार

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1960 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेवगापिंप्री,ता जामनेर,जामनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेवगापिंप्री,ता जामनेर,जामनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वसंत पंडीत बारी | | वडील का नाम : पंडीत बारी | 1. शेदुर्णी ,ता जामनेर,पहुर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 6 नोटा तडजोडी अंती | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील तक्रारदार यांचे नावे चिंचोलीपिंप्री शिवारात शेत गट नं 132/1 क्षेत्र 0.82 आर दोन असे एकुण 02 एकर शेती आहे.तक्रारदार यांनी दिनांक 14/07/2021 रोजी सदर शेतात महात्मागाँधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मिळणाऱ्या गुरांचा गोठा (शेड बांधणी) 15x30 या आकाराचा यासाठी अनुदाण मिळणेसाठी स्वताचे नावे विहीत नमुण्यात कागदपत्रासह अर्ज भरुन ग्रामपंचयात मार्फतीने पंचायत समिती जामनेर यांचे कार्यालयात सादर केला होता.तक्रारदार यांनी दिनांक 10.01.2022 रोजी पंचायतसमिती कार्यालय जामनेर येथे जावुन संबंधीत लिपीक वसंत बारी यांची भेट घेवुन गोठा अनुदानाविषयी त्यांचेशी बोलणी केली तेव्हा लिपीक वसंत बारी यांनी तक्रारदार यांना तुमचे अनुदान मंजुर झाले आहे परंतु तुमच्या गोठा अनुदानासाठी वर्कऑर्डर काढावी लागेल वर्कऑर्डर काढल्यानंतरच तुम्हाला अनुदानाचे पैसे मिळतील परंतु सदरची वर्कऑर्डर गटविकास अधिकारी मॅडम यांचे सहीशिवाय निघत नाही त्यासाठी गटविकास अधिकारी मॅडम यांना 5000/- रु द्यावे लागतील असे सांगुन 5000/- रु लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रारदार यांनी दिनांक 11/01/2022 रोजी अँन्टीकरप्शन ब्युरो जळगाव कार्यालयाकडे तक्रार दिली होती. सदर तक्रारीची अँन्टीकरप्शन ब्युरो जळगाव पथकाने दिनांक 11.01.2022 रोजी पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचे कडे महात्मागाँधी राष्ट्रीय रोजगार हमीयोजने अंतर्गत झालेल्या गुरांचे गोठा अनुदानाची वर्कऑर्डर देण्याचे मोबदल्यात गटविकासअधिकारी यांचे नावाने तडजोडी अंती 3000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दिनांक13.01.2022रोजी वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी आलोसे यांनी स्वताहा स्वीकारली म्हणुन गुन्हा.रजि दाखल करुन सोबत टंकलीखीत फिर्याद जोडली आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास आम्ही स्वताहा एन एन जाधव पोलीस निरीक्षक अँन्टीकरप्शन ब्युरो जळगाव हे करीत आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): KIRAN BAJIRAO SHINDE(I (Inspector)) / 14901000362KBSM8001X **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

[signature]

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature] [stamp: पोलीस निरीक्षक जामनेर पोलीस स्टेशन]

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)
**Name** (नाव): KIRAN BAJIRAO SHINDE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362KBSM8001X

**फिर्याद** **जामनेर पोलीस स्टेशन, जि.जळगाव**

**दिनांक १३.०१.२०२२**

**मी ममराज भुरा पवार, वय ६२, व्यवसाय शेती व मजुरी, रा.शेवगापिंप्री ता.जामनेर जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहतो.मी दि.१०.०१.२०२२ रोजी सायंकाळी ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस समक्ष हजर राहुन जामनेर येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबधी तोडी तक्रार केली होती व त्यावेळी मी त्यांना दि.११.०१.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. जामनेर ते जळगांव रोडवरील जामनेर शहरापासुन ०१ कि.मी. अंतरावर असलेल्या सोमेश्वर महादेव मंदिराजवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे मी दि.११.०१.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. जामनेर ते जळगांव रोडवरील जामनेर शहरापासुन ०१ कि. मी. अंतरावर असलेल्या सोमेश्वर महादेव मंदिराजवळ माझे मोटर सायकल सह उपस्थीत होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील,पोनि, एन.एन.जाधव मॅडम, पोनि.बच्छाव साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी पोनि.एन.एन.जाधव मॅडम, पोनि. बच्छाव साहेब तसेच सोबत असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन माझी लाचे संबधीची तक्रार पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी खाजगी वाहनात सोबत आणलेल्या लॅपटॉप संगणकावर टंकलिखीत करुन घेतली ती पुढील प्रमाणे.

समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुंटूंबासह राहत असुन शेती व मजुरी करुन कुटूंबांचा उदरनिर्वाह करतो. माझे स्वत:चे नावे चिंचोली पिंप्री शिवारात शेतगट नं.१३२/१, क्षेत्र ०.८२ आर दोन असे एकुण ०२ एकर शेती आहे. सदरची शेती मी करतो व उर्वरीत काळात मोल मजुरी करीत असतो.

मी दि. १४.०७.२०२१ रोजी सदर शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मिळणा—या गुरांचा गोठा (शेडबांधणी) १५x३० या आकाराचा यासाठी अनुदान मिळणेसाठी माझे स्वत:चे नावे विहीत नमुन्यात कागदपत्रांसह अर्ज भरुन ग्रामपंचायत मार्फतीने पंचायत समिती जामनेर यांचे कार्यालयात जावुन तेथील लिपीक वसंत बारी यांचेकडे दिला होता.

मी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मिळणा—या गुरांच्या गोठयाच्या शेडबांधणीसाठी सादर केलेला अर्ज हा पंचायत समिती कार्यालय, जामनेर यांचेकडून साधारण दोन ते तीन महिन्यात मंजुर होतो हे मला माहीत आहे.सदर गुरांचा गोठा बांधणीसाठी मला शासनाकडून १०० टक्के प्रमाणे ७५,०००/—रु.अनुदान भेटणार होते. मी पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे सुमारे ५ महिन्यापुर्वी अर्ज दिला असल्याने सदरचे अनुदान मंजुर झाले बाबत मला समजले.

मी दि.१०.०१.२०२२ रोजी पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे जावुन संबंधीत लिपीक वसंत बारी यांना जावुन भेटलो व माझे गोठा अनुदानाविषयी त्यांचेशी बोलणी केली असता, माझे नमुद अनुदान मंजुर झाले असल्याबाबत मला समजले आहे असे त्यांना विचारले असता त्यांनी मला सांगितले की, हो तुमचे अनुदान मंजुर झाले आहे. परंतु तुम्हाला तुमच्या गोठा अनुदानासाठी वर्क ऑर्डर काढावी लागले. वर्क ऑर्डर काढल्यानंतरच तुम्हाला अनुदानाचे पैसे मिळतील. परंतु सदरची वर्क ऑर्डर गटविकास अधिकारी मॅडम यांच्या सही शिवाय निघत नाही. त्यासाठी तुम्हाला गटविकास अधिकारी मॅडम यांना ५,०००/—रु.द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना सदर पैशांची शासकीय पावती मिळणार का? असे विचारले असता त्यांनी मला सांगितले की, अशी कोणतीही पावती मिळणार नाही. तेव्हा मला समजले की, लिपीक वसंत बारी हे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मला शासनाकडुन मंजुर झालेल्या गुरांचा गोठा अनुदानाची वर्कऑर्डर देण्याचे मोबदल्यात गटविकास अधिकारी मॅडम यांचे नावाने माझे कडेस ५,०००/—रु. लाच रकमेची मागणी करीत असले बाबत माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना आता माझे जवळ पैसे नाहीत मी तुम्हाला उद्या दिनांक ११.०१.२०२२ रोजी येवुन भेटतो असे सांगुन सदर कार्यालयातुन निघुन आलो आहे.

मला महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या गुरांचा गोठा अनुदानाची वर्क ऑर्डर देण्याचे मोबदल्यात गटविकास अधिकारी यांचे नावाने लिपीक वसंत बारी यांना त्यांनी मागणी केलेले ५,०००/—रु. लाच रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही, परंतु मी जर कारकुन वसंत बारी यांना लाचेची रक्कम दिली नाही तर, ते गटविकास अधिकारी मॅडम यांच्याकडुन माझे वर नमुद कामाची वर्क ऑर्डर तयार करुन देणार नाहीत. अथवा वर्क ऑर्डर देण्यास विलंब करतील, परीणामी माझे वर नमुद अनुदानाचे मंजुर झालेले पैसे मिळण्यास विलंब होईल म्हणुन मी नाईलाजाने लिपीक वसंत बारी यांना त्यांनी मागणी केलेली ५,०००/—रु.लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी बाबत नमुद आहे.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले व सदरचे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह लिपीक वसंत बारी यांची भेट घेण्यासाठी पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन पंचायत समीती कार्यालय,जामनेर येथे गेलो. तेव्हा सदर कार्यालयात लिपीक वसंत बारी हे दिसुन आले नाही. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन माझे मोबाईल फोनवरुन

दि. 13/01/2022 रोजी जामनेर पो. स्टे. गुरन- 27/2022 भ्र.प्र.अधि.सन 1988 चे कलम 7 प्रमाणे नोंदी 38 वर 19/12 वा. नोंद केली आहे.

[signature] 13/1/258

पोलीस ठाणे अंमलदार
जामनेर पोलीस स्टेशन

लिपीक वसंत बारी यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना मी काल आलो होतो. ममराज शेवग्याहुन, भेटलो होतो आपल्याला, ममराज भुरा पवार, मी आलो आहे ऑफिसला असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी आलो आलो असे सांगुन फोन बंद केला होता. त्यानंतर लिपीक वसंत बारी हे लागलीच कार्यालयात आले. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना नमस्कार दादा, लवकर आले, ते आपण काल भेटलो होतो ना, तुम्ही म्हणे, मॅडमांशी बोलु, करुन टाका गरीब माणसं हे, काल बोलले होते तुम्ही, असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी मला तुम्ही करुन ठेवजा, मॅडमांशी बोललो आहे मी, तुमच्या समोर देतो, टेंन्शन घेवु नका, संध्याकाळी करुन द्या, मी सांगितल्यावर कोणते बी काम होतं, काय देण असलं ते देवुन द्या, अणं मोडा तंटा, मॅडमला सांगितले हे मी, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना मॅडमला पैसे देणार नाही तुम्ही, तुम्ही देशान का मॅडमांना, असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी जितके देणं असलं तितके देवुन दे जा, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना कालदी पाच मांगितले होते तुम्ही, असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी मला जे देणं असलं ते देवुन द्या, मोकळ करा, मी लगेच देवुन देतो अणं करुन घेतो तुमचं काम, असे सांगुन उजव्या हाताचे तीन बोटे दाखवुन तीन हजार रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना तीन हजार रुपये जास्त होता नं,असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी मला ते पहा तुम्ही मले नका सांगा, आता तुम्हाले जे सांगितले, ते बी करता नही तुम्ही, तुमचे तोंडाने बोलता, असे सांगितले. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना मी मॅडमांना भेटून घेतो असे सांगुन मी व पंच क्र.०१ असे गटविकास अधिकारी मॅडम यांचे कक्षात जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा मी गटविकास अधिकारी मॅडम यांना माझे गोठयाचे वर्क ऑर्डर बाबत सांगितले असता गटविकास अधिकारी मॅडम यांनी मला वर्क ऑर्डर काढलेली आहे त्या दिवशी तुम्ही सांगितल्यावर कोण म्हणंत नही हे, असे सांगितले असता मी मॅडम यांना बारी अण्णा भेटले, निघालेले नाही म्हणे, मॅडमांना भेटावं लागले, मॅडमला तीन हजार रुपये दे म्हणे बाबत सांगितले असता गटविकास अधिकारी मॅडम यांनी मला बिलकुन नही, मी बिलकुल कुन्हाला काही सांगितले नाही, काहीतरी सांगतात, माझ्या नावाचा वापर करतात, कोणाला काही द्यायचे नाही पैसे,तुमचे काम केलेले हे मी, असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, लिपीक वसंत बारी व गट विकास अधिकारी मॅडम यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोनि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा लिपीक वसंत बारी यांनी माझे नमुद कामाची वर्क ऑर्डर देण्याच्या मोबदल्यात गट विकास अधिकारी मॅडम यांचे नाव सांगुन माझेकडेस ३०००/—रु.लाचेची मागणी केल्याबाबत खात्री झाली तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला ३,०००/—रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे घर खर्चातुन आणलेले ३,०००/—रु त्यात ५००/—रु.दराच्या ०६ नोटा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मी हजर केलेले ३,०००/—रु त्यात ५००/—रु.दराच्या ०६ नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशयात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या.त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले.त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह लिपीक वसंत बारी यांची भेट घेण्यासाठी पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन पंचायत समीती कार्यालय,जामनेर येथे जावुन लिपीक वसंत बारी यांची भेट घेतली. तेव्हा लिपीक वसंत बारी यांनी मला कार्यालयातील एका कर्मचा—याकडे बोट दाखवुन हे रोहयो समितीचे अध्यक्ष आहेत असे सांगुन ओळख करुन दिली व त्यांचे कडे तुमचे नाव लिहून द्या असे सांगितले. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशास हात लावुन आणले आहेत मी, तुम्ही सागितल्याप्रमाणे घेवुन आलो आहे असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी मला आज नका देवु मॅडम नाही हे, गुरूवारी या, असे सांगितले. त्यानंतर मी पंच क्रं. १ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो. माझेजवळ दिलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे व लिपीक वसंत बारी यांचेमध्ये झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पो.नि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथकाने ऐकले.तेव्हा लिपीक वसंत बारी यांनी मला गुरूवार दि. १३.०१.२०२२ रोजी बोलविले असल्याची खात्री झाली. त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी पुढील सापळा कार्यवाही गुरूवार दि. १३.०१.२०२२ रोजी करण्याचा निर्णय घेतला व मला दि.१३.०१.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. जामनेर ते जळगांव रोडवरील जामनेर शहरापासुन ०१ कि.मी. अंतरावर असलेल्या सोमेश्वर महादेव मंदिराजवळ हजर राहण्याबाबत सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले तसा पंचनामा केला आहे.

त्याप्रमाणे मी दि.१३.०१.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. जामनेर ते जळगांव रोडवरील जामनेर शहरापासुन ०१ कि.मी. अंतरावर असलेल्या सोमेश्वर महादेव मंदिराजवळ उपस्थित होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील, पो.नि.एन.एन.जाधव मॅडम, पो.नि.बच्छाव साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले.

त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं. १ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.एन.एन. जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सुरु करुन माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह लिपीक वसंत बारी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे माझे मोटार सायकलने सापळा पथकापासुन निघुन पंचायत समीती कार्यालय, जामनेर येथे गेलो. तेव्हा सदर ठिकाणी लिपीक वसंत बारी हे दिसुन आले नाही. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन माझे मोबाईल फोनवरुन लिपीक वसंत बारी यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी लिपीक वसंत बारी यांना मी ममराज बोलतो, तुम्ही आले का? पंचायत समिती मध्ये असे विचारले असता त्यांनी आलोच दहा एक मिनीटांने असे सांगुन फोन बंद केला होता. त्यानंतर काही वेळाने लिपीक वसंत बारी कार्यालयात आले. तेव्हा मी त्यांना बारी आण्णा झालं का,आपलं वर्क ऑर्डरचं असे विचारले असता त्यांनी झालं तुमचं, तुमचं काम झाल ना असे सांगितले. तेव्हा मी त्यांना माझे शर्टच्या उजव्या खिशात असलेली लाचेची रक्कम ३,०००/— रुपये बाहेर काढुन त्यांच्या समोर हे ३,०००/— रु हे, सांगितल का मॅडमला, काही नाराज होवु नका, लवकर वर्क ऑर्डर काढुन द्या, असे सांगितले असता लिपीक वसंत बारी यांनी ही प्रक्रीया झाली म्हणजे झालं असे सांगितले.तेव्हा मी त्यांना ३,०००/—रुपये मोजुन घ्या असे सांगुन सदर लाचेची रक्कम लिपीक वसंत बारी यांच्या समोर धरली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन घेतली.त्यानंतर मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला.तेव्हा पो.नि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथक यांनी लिपीक वसंत बारी यांना रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी लिपीक वसंत बारी यांना आपली स्वतःची तसेच पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस. पाटील,पो.नि.एस.के.बच्छाव व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी लिपीक वसंत बारी यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव वसंत पंडीत बारी, वय ५३, व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक पंचायत समिती कार्यालय, जामनेर रा. शेंदुर्णी, भवानी देवी मंदीरा जवळ ता. जामनेर जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये वसंत बारी, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी केली आहे. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी वसंत पंडीत बारी, वय ५३, व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक पंचायत समिती कार्यालय, जामनेर यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन, भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन दि.११.०१.२०२२ रोजी पंचासमक्ष माझे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या गुरांचा गोठाच्या अनुदानाची वर्क ऑर्डर देण्याचे मोबदल्यात माझेकडेस ३,०००/—रु.लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर सदर लाच रक्कम आरोपी याने दि.१३.०१.२०२२ रोजी ११.५६ वा. जामनेर शहरातील जामनेर पंचायत समिती कार्यालयात स्वतः स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

(signature)

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**फिर्यादीची सही**

ममराज हिरा पवार